लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज योग प्रशिक्षण

कोल्हापूर : आंतराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवार, दिनांक २१ रोजी योग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाचे योग केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सकाळी ७:२० ते ८:२० या कालावधीत हे प्रशिक्षण होणार आहे. या कार्यक्रमास विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सामूहिक योग प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास केंद्रामार्फत सुरू असलेले योग केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि. २१) रोजी सकाळी ७.२० वाजता विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सामूहिक योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

लोकमत

# १०६९१ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून, मंगळवारी एमएससी, एम.कॉमसह विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी १०६९१ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेवेळी कोल्हापूर जिल्ह्यात ५, सांगली जिल्ह्यात ४ व सातारा जिल्ह्यात, एक अशा १० गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली.

सकाळ

# 'पदवी'च्या १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी पदवीच्या विविध १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. त्यामध्ये बी. एस्सी. एन्व्हारमेंटल सायन्स, बी. डी. एस., बी. ए., बी. एड., एम. सी. ए., आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठाने दिवसभरात एम. एस्सी., एम. कॉम., बी. टेक., एम. ए., अशा १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या. त्यासाठी एकूण १०,६९१ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेत कॉपी करणाऱ्या १० विद्यार्थ्यांना भरारी पथकाने पकडले. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील ५, सांगलीमधील ४ आणि सातारा जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, एम. फिल., प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्याबाबत परीक्षा मंडळाने अधिविभागांना परिपत्रकाद्वारे सूचना केली आहे.

पुढारी



शिवाजी विद्यापीठातून

# विद्यापीठाकडून पदवी अभ्यासक्रम ६७ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाचे आजअखेर सुमारे ६७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत मंगळवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आटर्स, बॅचलर ऑर्किटेक्चर, मास्टर ऑफ सायन्स (टेक्नॉलॉजी)आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेसाठी १० हजार ६९१ विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, मंगळवारी बीएस्सी. (पर्यावरणशास्त्र), बीडीएस, बीए.बी.एड., पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईटस आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. भरारी पथकाकडून १० गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.

21 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

# उत्सव नव्हे गरज!

जागतिक तापमानवाढ हा आज सर्वत्र चर्चेचा विषय आहे. पूर्वीही तापमानवाढ होत असे, मात्र ही तापमानवाढ स्थानिक आणि तत्कालीन असे. पुन्हा काही दिवसात तापमान पूर्वपदावर येत असे. प्रामुख्याने ऋतूमानाप्रमाणे हे बदल असत. परिणाम तत्कालीन असत. त्यामुळे जागतिक पातळीवरील सरासरी तापमानात फारसा बदल नसायचा. सध्या जागतिक पातळीवर तापमानवाढ वेगाने होत आहे. विशेष हे की, मानवनिर्मित कारणांपेक्षा निसर्गातील विविध प्रक्रियांमुळे होणारी तापमानवाढ जास्त आहे. हा नेमका प्रकार होतो तो हरित वायुंमुळे वातावरणातील बाष्प, कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि इतर घटकांमुळे सूर्यकिरणे शोषली जातात. परिणामी उष्णता वातावरणात धरून ठेवली जाते. शेवटी याचा परिणाम वातावरणाच्या तापमान वाढीमध्ये होतो. यालाच हरितगृह परिणाम म्हणतात, तर पृथ्वीवरील वातावरणाच्या तापमान वाढीस कारण असणाऱ्या या वायूंना हरित वायू म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडणारी सूर्यकिरणे पृष्ठभाग शोषून घेतो आणि रात्री त्यामुळे प्राप्त ऊर्जा उत्सर्जित करतो. उत्सर्जित झालेले उष्मा कण हरित वायू शोषून घेतात आणि पृथ्वीचे तापमान रात्री जितके कमी होणे आवश्यक असते तितके होत नाही. ही प्रक्रिया आवश्यक असते. जर हे घडले नाही तर पृथ्वीचे सरासरी तापमान तीस डिग्री सेल्सियसने कमी राहील, हेसुद्धा जीवसृष्टीला घातक ठरले असते.

पृथ्वीच्या वातावरणाची तापमानवाढ प्रामुख्याने वाफेमुळे होते. वनस्पती आणि कृषी क्षेत्रातून वाफेचे प्रमाण वाढते. मात्र, त्याचबरोबर कारखाने, नागरी वस्त्यांमधून मानवाच्या सुखकर जीवनासाठी इंधन जाळण्यातून मोठ्या प्रमाणात हरित वायू म्हणजेच कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड इत्यादी वायू वातावरणात मिसळतात. त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत असते. यालाच जागतिक तापमानवाढ म्हणतात. याचा सर्वात पहिला परिणाम जलचक्रावर होतो. समुद्रातील पाण्याची वाफ होणे, बर्फाची शिखरे आणि समुद्र वितळणे हे सर्व तापमान वाढीसोबत घडते. जलचक्र बदलत असताना त्यामध्ये अचानक बदल होतात. यालाच आपण हवामान बदल असे म्हणतो. ही तापमानवाढ आणि त्यामुळे होणारे बदल हे आता पृथ्वीवरील जीवसृष्टीला घातक ठरत आहेत.

मागील काही वर्षांत याची तीव्रता वाढली आहे. अनेक ठिकाणी भरपूर पाऊस पडतो. ज्या भागात ढगफुटी हा शब्द ऐकावयास मिळत नसे, त्या भागात वारंवार ढगफुटीच्या घटना घडत आहेत. पूर आणि महापूर ही दरवर्षी अनेक भागांत समस्या बनली आहे. काही भागात तापमान हे पूर्वीचे सर्व उच्चांक मोडून नवा उच्चांक करत आहे, तर ज्या भागात पूर्वी उन्हाळा असह्य व्हायचा, त्या भागात उन्हाळा एवढा तीव्र होईनासा झाला आहे. जो भाग इतर भागांच्या तुलनेने शांत मानला जातो, त्या भागात वारंवार वादळे तयार होत आहेत. ज्या अरबी समुद्रात कधी तरी एखादे वादळ यायचे, त्याच समुद्रात आता वारंवार वादळे येतात. या वर्षी बिपरजॉय वादळाने तर कहर केला. त्याने गुजरात आणि पाकिस्तानात केलेले नुकसान अब्जावधींचे आहे. या बदलांमागे हवामान बदल आणि हवामान बदलांमागे हरितगृह वायू आहे.

हरितगृह परिणामामध्ये सर्वात जास्त योगदान हे पाण्याच्या वाफेचे आहे. मात्र, वाफेमुळे होणारी तापमानवाढ तात्पुरती असते. वातावरणात येणारा कार्बन डाय ऑक्साईड आणि इतर वायू हे तापमानवाढीचा परिणाम दीर्घकाळ टिकवून ठेवतात. कारखाने, वाहनांचा वापर यातून बाहेर पडणाऱ्या वायूंचा प्रभाव जाण्यासाठी आणि औद्योगिक क्रांतीपूर्व पर्यावरण



तुलनेने शांत भागात वारंवार वादळे तयार होत आहेत.

निर्मितीसाठी संपूर्ण औद्योगिक यंत्रणा आणि या वायूंना वातावरणात सोडणाऱ्या यंत्रणा बंद ठेवाव्या लागतील. १७५० मध्ये औद्योगिक क्रांती झाल्यापासून वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण ३० टक्क्यांनी वाढले आहे. मिथेनचे प्रमाण १४० टक्के वाढले आहे. याचा परिणाम म्हणून मागील १०० वर्षांत पृथ्वीचे सरासरी तापमान ०.६ डिग्री सेल्सियसने वाढले आहे. गेल्या तीस वर्षांतील ही वाढ ०.६ डिग्री सेल्सियसने वाढली आहे. समुद्राच्या पाण्याच्या पातळीमध्ये ३ मिलिमीटरने वाढ झाली आहे.

वातावरणाचे तापमान वाढले की, त्याचा परिणाम सर्वच गोष्टींवर होतो. तापमान वाढीचा परिणाम म्हणून बर्फाचे थर वितळण्यास सुरुवात होते. हवा प्रसरण पावते. पाणी प्रसरण पावते. त्यामुळे पाण्याची एकूण पातळी वाढते. १९७९ पासून अंटार्क्टिका भागातील बर्फाचे क्षेत्र कमी होत आहे. पृथ्वीवर एकूण बर्फ २८ कोटी चौरस किलोमीटर आहे. यातील केवळ २.८ दशलक्ष चौरस किलोमीटर एवढे बर्फ वितळले तर पाण्याची पातळी सहा मीटरने वाढेल. त्यामुळे अनेक गावे आणि शहरे पाण्याखाली जाणार आहेत.

याचा परिणाम वनस्पतीवरही मोठ्या प्रमाणात पडत आहे. वनस्पतींना फुले लवकर येऊ लागली आहेत. फळेही लवकर येऊ लागली आहेत. प्राण्यांचे क्षेत्र मर्यादित असते. वाघ, चित्ते यांचे क्षेत्र आखून घेतलेले असते. हे क्षेत्र कमी होत आहे. एकविसाव्या शतकाच्या अखेरीस पृथ्वीचे तापमान १.५ डिग्री सेल्सियसने वाढेल असे संशोधकांचे मत आहे. जागतिक तापमानवाढ जर दोन डिग्री सेल्सियसने झाली, तर पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टी नष्ट पावेल. त्यामुळे संशोधक १.५ डिग्री सेल्सियसपेक्षा तापमान कमी ठेवण्यासंदर्भात वारंवार सांगत आहेत.

याचे परिणाम काय होतील हे नेमके सांगता येणार नाही, असे संशोधक सांगत असले तरी अनेक परिणाम आता दिसू लागले आहेत. पर्जन्यमान बदलले आहे. पावसाळ्यात पाऊस भरपूर पडला, पावसाळ्यात धरणे भरून वाहिली, तरी पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. पूर, वादळे, उष्ण वारे, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढेल. शेतीमधून मिळणारे उत्पादन घटल्याने अन्नटंचाई होईल. वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढल्याने पाणी आम्लधर्मी बनेल. त्यामुळे कोरल रीफ प्रवाळांना कॅल्शियमयुक्त आसरा मिळत नाही. परिणामी हे प्रवाळ भविष्यात नष्ट होऊ शकते. वनस्पती आणि प्राण्यांना या वातावरणातील बदलांशी जुळवून घेणे कठीण जाईल. अनेक प्रजातींना अनुकूल वातावरण न मिळाल्यास त्या नष्ट होतील. कोणतीही घटना हवामान बदलामुळे घडली, असा सहसंबंध सहज जोडता येत नाही. मात्र, निसर्गचक्राच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत सर्वांना त्रासदायक ठरणारी गोष्ट तापमानवाढ आहे. एकूणच तापमानवाढ आणि त्यातून होणाऱ्या बदलांमध्ये, जीवसृष्टी धोक्यात येत आहे.

मागील काही वर्षांपासून तापमानवाढ टाळण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज सर्वच देश व्यक्त करतात. ठोस पावले मात्र छोट्या देशांनी उचलली. यासाठी जल, जंगल आणि जमीन यांचा समतोल हवा. यासाठी झाडे लावायला हवीत. आपणही पर्यावरण चांगले राहावे म्हणून झाडे लावतो. मात्र, ती उत्सवासारखी न लावता, गरज म्हणून लावायला हवीत!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

21 JUN 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगाराच्या संधींकडे घेऊन जाणारे पदवीचे शिक्षण



**दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व १२ अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली. जे नोकरदार आहेत, ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिलेले असेल, अशा व्यक्तींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मोठी संधी या माध्यमातून मिळाली, त्याचा सर्वांनी उपयोग करून घ्यावा.**

**- प्रा. डॉ. डी. के. मोरे**

शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण आणि ऑनलाईन केंद्र स्थापनेपासून बाहेरील शिक्षण (External) म्हणून इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठांतर्गत कार्यरत होते. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग आणि डिस्टन्स एज्युकेशन ब्यूरोंतर्गत २००७ पासून दूरशिक्षण केंद्र आणि आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या गॅझेटनुसार दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रे म्हणून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कार्यरत आहेत. या माध्यमातून शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे काम सविस्तरपणे सुरू आहे. त्याच अनुषंगाने आजही शिक्षणापासून वंचित असणारे घटक आपणाला स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, उद्योजक, कामगार, शेतकरी, सैनिक व बंदीजन यांच्यापर्यंत शिक्षणाची ही गंगा पोचविणे आवश्यक आहे. या सर्व घटकांचे शैक्षणिक समावेशन करताना त्यांच्यासाठी करिअर, रोजगाराच्या संधी कोणत्या आहेत, हे पाहू.

भाषेच्या अनुषंगाने करिअरच्या बाबतीत विचार केल्यास भाषेतील करिअरचे दालन हे अलीकडील नवतंत्रज्ञानामुळे खुले झाले आहे. विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान भाषेतील निर्माण होणाऱ्या संधींचा शोध घेऊन त्या दृष्टिकोनातून कौशल्य विकसित करायला हवे. भाषेच्या अभ्यास साहित्यकेंद्रीत न करता उद्योग व व्यावसायिकताभिमुख नवसंधीचा शोध घेण्यासाठी केला पाहिजे. स्मार्टफोन, संगणक व वेब यातील भाषेतून करिअर करणाऱ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणी, चित्रपट, जाहिरात, अनुवाद, सूत्रसंचालन यात भाषा विषयातील विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी आहेत. कोरोना संकटामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. अशातच शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सामाजिकशास्त्र विद्याशाखेतील विविध विषयाच्या अनुषंगाने म्हणजेच इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या विषयांमध्ये करिअरच्या संधींचा आढावा घेताना हे स्पष्टपणे सांगता येईल, की समाजात किंवा बाहेरच्या जगात नेहमीच रोजगाराच्या दृष्टीने खडतर परिस्थिती असली तरी कौशल्याधारित उच्चशिक्षणातून निश्चितपणे रोजगाराच्या संधी प्राप्त होत असतात. इतिहास विषयात उच्चशिक्षण घेणाऱ्यांना पर्यटनस्थळे शोधता आली पाहिजेत, त्याची वैशिष्ट्ये ओळखून पर्यटन लेखन व पुस्तिका लेखन केल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते. वस्तुसंग्रहालय, पुराभिलेखागार याठिकाणी तज्ज्ञांची व मार्गदर्शकांची आवश्यकता असते, तसेच देश-विदेशात मोडी तज्ज्ञ भाषांतरकार यांची आवश्यकता असते. त्यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

राज्यशास्त्र हा विषय सर्वस्पर्शी असल्याने विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही क्षेत्रात सामोरे जाण्याची क्षमता असते, म्हणूनच रोजगार प्राप्तीसाठी राज्यशास्त्र हा विषय बहुआयामी आहे. राज्यशास्त्र विषयात करिअर करण्यासाठी शिक्षकी पेशा, स्पर्धा परीक्षा अंतर्गत राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, राजकीय विश्लेषक, पत्रकारिता, राज्यशास्त्र, नेतृत्व विकास, निवडणूक अंदाजशास्त्र, संविधानिक कायदा सल्लागार व मानवी अधिकार आदी क्षेत्रांमध्ये विशेष करून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. समाजशास्त्रातील करिअरच्या संधींमध्ये नेट-सेट, राज्यसेवा, केंद्रीय लोकसेवा आयोग, समाजकल्याण अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, बिगर सरकारी संघटन संस्था, सामाजिक संशोधन, प्रशासक, सार्वजनिक धोरण संशोधक, जर्नालिझम ॲण्ड कम्युनिकेशन, मीडिया ॲण्ड मार्केट यांसारख्या विविध विषयांमध्ये समाजशास्त्र असणारा विद्यार्थी आपले करिअरचे यश प्राप्त करू शकतो. अनेक सामाजिक घटनांचे जागतिक वैश्विक घटनांचे विश्लेषण करून उपाययोजना सुचवू शकतो. कोरोनानंतरच्या बदलत्या वैश्विक परिस्थितीत समाजशास्त्रज्ञ यांचे महत्त्व खूपच वाढलेले दिसते.

अर्थशास्त्रातील करिअरच्या संधींमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन, शिक्षण क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, एमपीएससी, नाबार्ड/आरबीआय, जिल्हा परिषद, शासकीय उपक्रम, खासगी प्रकल्प, संशोधन, एनएसएसओ/सीएसओ/निती आयोग, मिनिरत्न/ महारत्न/ सार्वजनिक कंपनी क्षेत्र, अभ्यासक्रमामधील लेखन आदी रोजगाराच्या संधी अर्थशास्त्रातून उपलब्ध होतात.

वाणिज्य विद्याशाखा विद्यार्थ्यांना बहुसंख्य रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या शाखेतील विद्यार्थ्यांना चार्टर्ड अकौंटंट, कंपनी सेक्रेटरी, बँकिंग, विमा आदी क्षेत्रांमध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नोकरी आणि व्यवसायाच्या संधी आहेत. तसेच वित्त, विपणन, करप्रणाली, लेखाअर्थ, व्यवसाय सल्लागार, गुंतवणूक, उद्योजकीय संधी, सेवा उत्पादन, कृषी, शेअर बाजार, कायदा, अध्यापन व संशोधन अशा विविध प्रकारच्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. त्या रोजगाराच्या संधी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी यशाचा प्रयत्न केला पाहिजे.

एमबीए ही पदवी आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे. व्यवसाय प्रशासन उद्योगात एमबीएधारकांना खूप मागणी विविध विषयांतून चांगली संधी मिळू शकते. जसे की फायनान्समध्ये कॉस्टिंग, बजेटिंग, इंटर्नल फायनान्स, कॅपिटल मॅनेजमेंट विषय शिकविले जातात. ज्यानंतर आर्थिक व्यवस्थापनाच्या विविध क्षेत्रांत संधी मिळेल. केवळ बँकिंग नाही, तर विमा उद्योग, म्युचुअल फंड, शेअर बाजार, आर्थिक सल्ला-मसलत या क्षेत्रात मागणी आहे. दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची दूरशिक्षण पद्धती आज महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. प्रत्यक्ष अनुभव आणि या केंद्रातील पदवी निश्चितपणे रोजगाराच्या संधींकडे घेऊन जाईल.

**(लेखक शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक आहेत.)**

## मार्केटिंग, बँकिंगमध्ये करिअरच्या संधी

मार्केटिंगमध्ये ग्राहकांची वर्तणूक, बाजारातील वर्तणूक, जाहिरातींचे विविध पैलू, उत्पादन, विविध बाजारांतील घटक क्षेत्रात संधी मिळते. ह्युमन रिसोर्समध्ये व्यवस्थापन, विलीनीकरण, संपादन, बाजारातील कामगारांची मागणी, पुरवठा व्यवस्थापन, नेतृत्व चांगला पर्याय ठरू शकतो. ऑपरेशनल मॅनेजमेंटमध्ये प्रॉडक्शन मॅनेजमेंट, शॉप फ्लोअर मॅनेजमेंट, उत्पादन विकास डिझायनिंग, प्रक्रिया ऑप्टिमायझेशनसारख्या अभियांत्रिकी कार्यासह उत्पादन व्यवस्थापन कार्याद्वारे यश मिळवू शकता. गणिताचा दैनंदिन जीवनात सातत्याने उपयोग होत असतो. त्यामुळे गणितीय दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम आहे. आयुष्याचे गणित सुरळीत करण्यासाठी गणित हा विषय महत्त्वाचा आहे. गणित विषयातून सांख्यिकी, भूमापन, वैद्यकीय, शेअर मार्केट, संगणक, एल.आय.सी., बँकिंग, शैक्षणिक व विमा आदी क्षेत्रांत संधी आहेत.